# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे – ४११ ०१६

☏(020)25656234, FAX : (020)25656234

**ईमेल : ropune@dtemaharashtra.gov.in संकेतस्थळ : ww.ropune.org.in**


जा.क्र.तंशिविकापु/विवि/प्रवेश प्रक्रिया २०१९-२०/5012 दिनांक : 04 DEC 2019

प्रति,

संचालक/प्राचार्य,

पुणे विभागातील सर्व तंत्रशिक्षण संस्था (पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम)

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० प्रथम वर्ष /थेट द्वितीय वर्ष पदवी व प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची 'सफलता पोर्टल' द्वारे कागदपत्रे तपासणी / पडताळणीबाबत व प्रवेश मंजुरीबाबत....

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र.तंशिविकापु/विवि/प्रवेश प्रक्रिया २०१९-२०/४७९३ दिनांक २२/११/२०१९
२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१९/परिपत्रक/८२७ दिनांक ०७/११/२०१९
३. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे परिपत्रक क्रमांक प्रनिप्रा/प्रक्र६६/नोंदणी प्रक्रिया/२०१९/९८७ दिनांक ३१/१०/२०१९

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक १ द्वारे मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा. मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० प्रथम वर्ष /थेट द्वितीय वर्ष पदवी व प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची कागदपत्रे तपासणी / पडताळणीबाबत व प्रवेश मंजुरीबाबतची कार्यवाही **'सफलता पोर्टल'द्वारे** करण्याबाबत सुचित केले आहे.. सबब या कार्यालयांतर्गत सदर कार्यवाही करण्याकरीता या कार्यालयाच्या अधिनस्त खालील तक्त्यानुसार उपकेंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

| **अनुक्रमांक** | **तपासणी केंद्राचे नाव** | **नेमुण दिलेला जिल्हा** | **अभ्यासक्रम** |
|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी महाविद्यालय,पुणे | **पुणे व सोलापुर** | **सर्व अभ्यासक्रम** (औषधनिर्माणशास्त्र वगळुन) |
| २ | वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियरिंग,सांगली | **सांगली, कोल्हापुर** | **सर्व अभ्यासक्रम** |
| ३ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कराड | **सातारा** | **सर्व अभ्यासक्रम** (औषधनिर्माणशास्त्र वगळुन) |
| ४ | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी | **पुणे (जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील संस्था)** | **सर्व अभ्यासक्रम** |
| ५ | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,कराड | **सातारा, सांगली, कोल्हापुर** | **औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम** |
| ६ | भारती विद्यापीठाचे पुना कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे | **पुणे व सोलापुर** | **औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम** |

या अनुषंगाने पुणे विभागातील सर्व तंत्रशिक्षण संस्थांच्या (पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम) संस्थाप्रमुखांना सुचित करण्यात येते की, प्रवेशित विद्यार्थ्यांची कागदपत्रे तपासणी / पडताळणीबाबत व प्रवेश मंजुरीबाबतची कार्यवाही **'सफलता पोर्टल'द्वारे** करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० प्रथम वर्ष /थेट द्वितीय वर्ष पदवी व प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची कागदपत्रे तपासणी / पडताळणीबाबत व प्रवेश मंजुरीबाबतची कार्यवाही ऑफलाईन पदधतीने या कार्यालयाकडुन करण्यात आली आहे. तसेच संस्थांना त्याबाबतचे पत्र देण्यात आले आहे. **सर्व संस्थांनी सदर गुणवत्ता यादी तपासणीबाबतचे पत्राची प्रत व प्रमाणित गुणवत्ता यादीची प्रत तसेच त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी ( विद्यार्थ्याचे नांव, ॲप्लिकेशन आयडी, प्रवेशित अभ्यासक्रम/शाखा/वर्ष, त्रुटीचे विवरण व शेरा ) उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे त्यांना नेमुन दिलेल्या केंद्राकडे दिनांक १२/१२/२०१९ पर्यत खास दुतामार्फत हस्तदेय जमा करावी.**

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : मा. संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग,मुंबई ४०० ००१ ( लक्षवेध : कार्यासन क्रमांक २ अ ) यांना सविनय सादर